आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

# सरकारी नोकरी मधील आरक्षण बंद होण्याच्या मार्गावर

देशामधील केंद्रीय सरकारी कार्यालय आणि विविध राज्यसरकारच्या कार्यालयातील यापुर्वी बढतीमध्ये दिलेल्या आरक्षणाला एम. नागराजन प्रकरणी धोका निर्माण झाला असुन मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, दिल्ली, कर्नाटक आणि महाराष्ट्र या राज्यातील बढतीमधील आरक्षण देण्यात आलेल्या कार्यवाहीला आव्हान देण्यात येऊन सर्व प्रकरणे सर्वोच्च न्यायालयाच्या एम. नागराजन प्रकरणाशी जोडले जात आहे. या न्यायालयीन निवाडयामध्ये आणि वारंवार असे म्हटले की, बढती मधील आरक्षण १६ (४ ब ) प्रमाणे "मागासलेपणा" "योग्य प्रतिनिधीत्व" या दोन बाबींची पुर्तता त्या त्या राज्यांनी करावी. याचाच अर्थ असा कि, अनुसुचीत जाती आणि अनुसुचीत जमाती हे मागासवर्ग आहे हे राज्याला सिध्द करावे लागेल. ख-या अर्थाने अनुसुचित जाती या अस्पृष्य मानल्या गेल्यामुळे आणि त्यांची पुर्वापार दैनी अशी स्थिती आणि शेकडो वर्षांचा अन्याय आणि अत्याचार सहन करणा-या मानव अधिकार नाकारलेल्या अशा या जातीचा शेडयुल तयार करुन राष्ट्रपतीच्या मान्यतसह संविधानाच्या ३४१ कलमाप्रमाणे त्यांच्यासाठी विशेष आरक्षणाची तरतुद करण्यात आली आहे. तसेच देशातील आदिम जमाती या आजही मुख्य प्रवाहापासुन दुर जंगलाच्या सानीध्यात राहणा-या अक्षम दुर्लक्षीत असलेल्या जाती विकासापासुन कोसु दुर आहेत. त्याला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संविधानाच्या ३४२ कलमाप्रमाणे राष्ट्रपतींची मान्यता घेऊन. त्यांना आदिवाशी ठरवण्यात आले आणि म्हणुनच त्यांच्यासाठी आरक्षणाची तरतूद आहे. याचाच अर्थ अनुसुचीत जाती आणि अनुसुचीत जमाती मागास असुन जन्म जातच त्यांच्यात मागासलेपणा आढळतो हे नव्याने सिध्द करण्याची गरज दिसत नाही.



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com
मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाहा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 256010

Scanned by CamScanner

# अर्थाचे अनर्थ

संविधानात असलेल्या तरतुदीचा अर्थ काढतांना (Interpitation) वाद विवाद होतात त्या संबंधी न्यायालयात खटले दाखल होतात. आणि उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयच केवळ संविधानाच्या तरतुदीचा अर्थ लावण्याचा अधिकार आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाने घोषीत केलेला कायदा भारताच्या राज्यक्षेत्रातील सर्व न्यायालयाला बंधनकारक करण्यात आलेले आहे. उदया जर एखादया व्यक्तिंनी हाच धागा पकडुन सर्वोच्च न्यायालयावर याचीका दाखल केली आणि जर उदया मागासलेपणाच्या बाबतीत सर्वाच्च न्यायालयाने एखादया राज्यात एस.सी. किंवा एस.टी. यांना त्या राज्यांकडुन संख्यात्मक आकडेवारी गोळा न झाल्यामुळे मागासलेपणा सिध्द न करु शकल्यामूळे बढती मधील आरक्षण थांबविले तर भरती मधील आरक्षण देता येणार नाही आणि या समाजातील कुठल्याही व्यक्तीला निवडणुक सुध्दा लढता येणार नाही. तेव्हा या प्रसंगी अर्थाचे अनार्थ होणार नाही याची आपण सगळयांनी काळजी घेतली पाहिजे.

## बढती मधील आरक्षण बंद झाल्यास तोच अर्थ भरती मध्ये लावल्या जाईल

भीती अशी निर्माण होत आहे की, न्यायालयाच्या माध्यमातुन जर हे सरकार चालत असेल, आणि संवीधानामध्ये तातडीने दुरुस्ती करण्याचे टाळत असेल, तर हाच नियम आणि निकष मागासवर्गीयांच्या भरती प्रकरणी लागु शकतो. त्यामुळे संपुर्ण आरक्षण बंद करावे लागेल.

एम. नागराजन प्रकरणी अनेक प्रश्न उपस्थित होतात. या बढतीच्या आरक्षणा प्रकरणी त्या मागासवर्गीय अधिका-यांचा काय दोष ? संवीधानाच्या या संदर्भाच्या तरतुदी प्रमाणे म्हणजेच कलम १६ (४ ब ) अनुसार त्यांना बढती दिली. सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सहानी प्रकरणी निकाल देताना आरक्षण हे ५० टक्के च्या वर जाता कामा नये अशी अट घातली; तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या साबरवाल प्रकरणी बढतीमध्ये आरक्षण देताना जर विहीत टक्केवारी भरली असेल तर प्रमोशन साठी आरक्षण देता येत नाही.



Scanned by CamScanner

## भितीचे वातावरण

आता मागासवर्गीयामध्ये भिती अशी निर्माण झाली आहे की,केंद्रात व राज्यात भाजप सरकार असल्यामुळे मागासवर्गीयाचे आरक्षण बंद होणार की काय ? मागील आठवडयात उत्तर प्रदेशातील पंधरा हजार पेक्षा जास्त कर्मचारी अधिका-यांना पदावन्नत करण्यात आले. ६ महिन्यापुर्वी मध्य प्रदेशात सुध्दा पाच हजार पेक्षा जास्त कर्मचारी अधिका-यांना पदावन्नत करण्यात आले. दिड महिन्यानंतर तोच धागा पकडून महाराष्ट्रातील जवळपास २५ हजार कर्मचा-यांना पदावन्नत करावे लागेल.त्यामुळे असे दिसत आहे की, सरकारी नोकरी मधील आरक्षण बंद होण्याच्या मार्गावर आहे.

## घटना दुरुस्ती करा

एकुणच आरक्षणाच्या बाबतीत संपूर्ण देशात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयात रोज अनेक प्रकरणे दाखल होत आहेत राज्य सरकार सुध्दा कर्मचा-यांच्या बाजुने उभे राहताना दिसत आहे आणि असे असेल राज्य सरकारची इच्छा शक्ती कर्मचा-यांना मदत करण्याची असेल म्हणजेच मागसवर्गीयाच्या बाजुने सामाजिक न्याय देण्याची असेल तर केंद्र सरकारने येत्या आगामी अधिवेशनात संवीधान संशोधन बिल आणून हा प्रश्न कायमचा मिटवावा अनेक राज्यामध्ये आरक्षणाच्या बाबतीत जी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. ती थांबवून कर्मचारी अधिका-यांना तातडीने दिलासा दयावा.

**हरिभाऊ राठोड,**

**आमदार आणि माजी खासदार**

**९९२०७१६९९९**



Scanned by CamScanner